दि. २५.०७.२०२३

## प्रेस नोट

**आरोपी लोकसेविका अश्विनी दत्तात्रय जाधव, वय ४७ वर्ष, पद – कनिष्ट लिपीक, ने. दुय्यम निबंधक कार्यालय, निलंगा, ता. निलंगा, जि. लातूर, रा. आदर्श कॉलनी लातूर, जि.लातूर यांनी लाचेची मागणी करून लाच स्विकारल्यावरून रंगेहाथ पकडल्याने गुन्हा.**

यातील आरोपी लोकसेविका अश्विनी दत्तात्रय जाधव, कनिष्ट लिपीक यांनी तक्रारदार यांना दुय्यम निबंधक कार्यालय, निलंगा येथे सर्च रिपोर्ट, सुची क्र.२, मुल्यांकन व नकला मिळणे कामी दाखल केलेल्या अर्जात माहीती व नकला पुरवण्यासाठी लाचेची मागणी केली असले बाबतची तक्रार दि. २४/०७/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर या कार्यालयाकडे प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्या कडून दि. २५/०७/२०२३ रोजी लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, वरील प्रमाणे प्राप्त तक्रारी नुसार कनिष्ट लिपीक अश्विनी जाधव यांना e-challan व्यतिरीक्त पैसे मागण्याचा व स्विकारण्याचा अधिकार नसताना **फिसच्या नावाखाली ३,२२५/–रूपये व वर काय द्यायचे ते द्या...!** असे म्हणुन लाचेची मागणी केल्याचे पंचासमक्ष लाच पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले.

त्यानुसार आज दि. २५/०७/२०२३ रोजी तक्रारदार हे आरापी लोकसेविका कनिष्ट लिपीक अश्विनी जाधव यांना e-challan व्यतिरीक्त पैसे मागण्याचा व स्विकारण्याचा अधिकार नसताना आलोसे जाधव यांनी फिसच्या नावाखाली ३,२२५/–रूपये व वर काय द्यायचे ते द्या..! असे म्हणल्या प्रमाणे अतिरीक्त १,२७५/–रूपये असे एकुण लाचेची रक्कम ४,५००/–रूपये आरोपी लोकसेविका जाधव यांना देण्यासाठी त्यांचे दुय्यम निबंधक कार्यालयात गेले असता आलोसे अश्विनी जाधव यांनी पावती तथा चलन न देता लाचेची रक्कम ४,५००/– रू पंचासमक्ष स्वत: स्विकारली. त्यावेळी त्यांना लाचेच्या रक्कमेसह जागेवरच रंगेहाथ पकडण्यात आले.

तक्रारदार यांचे फिर्यादीवरून लोकसेविका अश्विनी दत्तात्रय जाधव, कनिष्ट लिपीक यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन निलंगा ता. निलंगा, जि. लातूर येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. सदर गुन्हयाचा तपास श्री. पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनानूसार ला.प्र.वि. लातुर चे पोलीस उप अधीक्षक पंडीत रेजितवाड, पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली, पोलीस निरीक्षक अन्वर मुजावर, पोह/फारूक दामटे, भागवत कठारे, शाम गिरी, भिमराव आलुरे, पोना/संतोष गिरी, पोकॉ/शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, मपोकॉ/रूपाली भोसले पोकॉ/दिपक कलवले, संदीप जाधव, मंगेश कोंडरे, गजानन जाधव, चापोना/संतोष क्षिरसागर यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक | :– मोबाईल क्रमांक ०९६२३९९९९४४ |
| २) | श्री. पंडीत रेजितवाड, पोलीस उप अधीक्षक | :– मोबाईल क्रमांक ०९३०९३४८१८४ |
| ३) | टोल फ्री | :– १०६४ |
| ४) | हेल्पलाईन क्रमांक कार्यालयाचा फोन क्रमांक | :– ०२४८२–२४२६७४ |
| ५) | Website | :– www.acbmaharashtra.gov.in |
| ६) | Mobile App | :– www.acbmaharashtra.net |
| ७) | Facebook Page | :– www.facebook.com/MaharashtraACB |
| ८) | Twitter | :– ACBlatur |
| ९) | Instagram | :– Acblatur |
| १०) | YouTube Channel | :– anticurruptionbureaulatur1584 |

उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ★ लातूर ★

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर